असा. क्र २५ रजिस्टर्ड नं. एमएच/बाय-साऊथ/२०

# महाराष्ट्र शासन राजपत्र

**असाधारण**

**प्राधिकृत प्रकाशन**

शनिवार, मे १९, १९८०/आषाढ २८, शके १९०२

स्वतंत्र संकलन म्हणून फाईल करण्यासाठी या भागाला वेगळे पृष्ठ क्रमांक दिले आहेत

# भाग आठ

## विधेयके व अधिनियम यांचा मराठी अनुवाद

---

अनुक्रमणिका

| | पृष्ठे |
|---|---|
| सन १९८० चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ११—महाराष्ट्रातील पंढरपूर येथील मंदिरांमधील विवक्षित गैरकृत्यांचे उन्मूलन करण्यासाठी अधिनियम. | १९५–१९८ |

## MAHARASHTRA ACT No. XI OF 1980

## THE ERADICATION OF UNFAIR ACTIVITIES AT PANDHARPUR TEMPLES (FOR PROVIDING BETTER FACILITIES FOR WORSHIP) ACT, 1980

महाराष्ट्र विधानमंडळाच्या पुढील अधिनियमास राष्ट्रपती यांची संमती दिनांक १९ जुलै १९८० रोजी मिळाली असल्यामुळे तो, याद्वारे सर्व लोकांच्या माहितीसाठी प्रसिद्ध करण्यात येत आहे.

**एम. ए. धोत्रे,**
सचिव, महाराष्ट्र शासन,
विधी व न्याय विभाग.

५६



# MAHARASHTRA ACT No. XI OF 1980

## AN ACT TO ERADICATE CERTAIN UNFAIR ACTIVITIES AT PANDHARPUR TEMPLES IN MAHARASHTRA.

[ राष्ट्रपती यांची संमती मिळाल्यानंतर, महाराष्ट्र शासन राजपत्रात दिनांक १९ जुलै १९८० रोजी प्रथम (इंग्रजीत) प्रसिद्ध केलेला ]

## सन १९८० चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ११.

**महाराष्ट्रातील पंढरपूर येथील मंदिरांमधील विवक्षित गैरकृत्यांचे उन्मूलन करण्यासाठी अधिनियम.**

**ज्याअर्थी,** सोलापूर जिल्ह्यातील पंढरपूर येथील मंदिरांमधील गैरव्यवस्थेसंबंधी राज्य शासनाकडे तक्रारी आल्या होत्या, आणि म्हणून, इतर गोष्टींबरोबरच, पंढरपूर येथील मंदिरांमध्ये काम करणारे उपाध्याय आणि पुजारीवर्ग यांचे वंशपरंपरागत अधिकार आणि विशेषाधिकार संपादन करण्यासाठी आणि या मंदिरांचे प्रशासन व नियमन अधिक चांगल्या प्रकारे करण्यासाठी पंढरपूर मंदिरे अधिनियम, १९७३ हा अधिनियमित करण्यात आला होता; १९७४ चा महा. ९.

**आणि ज्याअर्थी,** हितसंबंधी लोकांनी न्यायालयात जाऊन सतत वाद उपस्थित केल्यामुळे, या अधिनियमाची कलमे १ (२), २१ ते ३१, ३३, ३४, ३८ आणि ३९ खेरीजकरून, त्याच्या इतर तरतुदी अंमलात आणणे शक्य झालेले नाही;

**आणि ज्याअर्थी,** ज्यामध्ये अधिनियमाच्या वैधतेला सुद्धा आक्षेप घेण्यात आला आहे अशा या बाबींच्या संबंधात न्यायालयाचा अंतिम निर्णय मिळण्यास बरीच वर्षे लागतील असे वाटते;

**आणि ज्याअर्थी,** पंढरपूरच्या मंदिरात येणाऱ्या विठोबा-रुक्मिणीच्या असंख्य भक्तांकडून शासनाकडे अशा तक्रारी आल्या आहेत की, मंदिरामध्ये पूजा करण्यासाठी किंवा इतर कोणताही धार्मिक विधी किंवा धार्मिक समारंभ करण्यासाठी मंदिरात प्रवेश करण्यास परवानगी देण्याकरिता या मंदिराचे पुजारी गैरवाजवी दक्षिणा, उपहार (ऑफरिंग्ज) देणग्या, दान, फी व इतर आकार यांची मागणी करून त्या भक्तांची पिळवणूक करतात आणि या पुजाऱ्यांच्या मागण्या पूर्ण केल्या नाहीत तर अशा भक्तांचा अपमान करण्यात येतो, त्यांना शिवीगाळ करण्यात येते किंवा शिव्याशाप देण्यात येतात आणि त्यांना धक्काबुक्की सुद्धा करण्यात येते;

**आणि ज्याअर्थी,** पंढरपूरच्या मंदिरात येणाऱ्या लक्षावधी भक्तगणांमध्ये पुजाऱ्यांच्या उपरोक्त गैरकृत्यांमुळे मोठ्या प्रमाणात अशांतता आणि असंतोष पसरला आहे;

**आणि ज्याअर्थी,** या कारणांसाठी विशेषत: आगामी आषाढी यात्रेच्या वेळी पंढरपूर येथे कायदा व सुव्यवस्थेच्या दृष्टीने जी गंभीर परिस्थिती निर्माण होण्याची शक्यता आहे ती टाळण्याच्या दृष्टीने पुजाऱ्यांच्या उपरोक्त गैरकृत्यांचे उन्मूलन करण्यासाठी आळा घालण्यासाठी तातडीने उपाययोजना करणे इष्ट आहे;

**त्याअर्थी,** भारतीय गणराज्याच्या एकतिसाव्या वर्षी याद्वारे पुढीलप्रमाणे अधिनियम करण्यात येत आहे :—

संक्षिप्त नाव व प्रारंभ. १. (१) या अधिनियमाला, पंढरपूर मंदिरांतील (पूजेसाठी अधिक चांगल्या सोयी करण्यासाठी) गैरकृत्यांचे उन्मूलन अधिनियम, १९८० असे म्हणता येईल.

(२) तो तात्काळ अंमलात येईल.

व्याख्या. २. या अधिनियमामध्ये संदर्भानुसार दुसरा अर्थ अपेक्षित नसेल तर,—

(अ) "पंढरपूर मंदिरे" म्हणजे, पंढरपूर मंदिरे अधिनियम, १९७३ याच्या कलम २ च्या खंड (झक) मध्ये व्याख्या देण्यात आली असेल अशी, महाराष्ट्र राज्यातील सोलापूर जिल्ह्यातील पंढरपूर येथील मंदिरे, १९७४ चा महा. ९.

१९७४ चा महा. ९. (ब) या अधिनियमामध्ये वापरण्यात आलेले परंतु व्याख्या देण्यात न आलेले शब्द व शब्दप्रयोग यांना पंढरपूर मंदिरे अधिनियम, १९७३ मध्ये त्यांना जे अर्थ देण्यात आले असतील, अनुक्रमे तेच अर्थ असतील.

पंढरपूरच्या मंदिरात प्रवेश करण्यास किंवा पूजा इत्यादी करण्यास प्रतिबंध करण्याबद्दल किंवा त्यापासून परावृत्त करण्याबद्दल शिक्षा.

३. जो कोणी——

(अ) कोणत्याही व्यक्तीला, लोकांसाठी मंदिर उघडे असेल अशा वेळेस पंढरपूरच्या मंदिरामध्ये प्रवेश करण्यास किंवा पूजा करण्यास किंवा प्रार्थना करण्यास किंवा तेथे कोणताही धार्मिक विधी किंवा समारंभ करण्यास प्रतिबंध करील किंवा करण्यापासून परावृत्त करील ;

(ब) अशा कोणत्याही व्यक्तीकडून, देवाचे दर्शन किंवा पदस्पर्श यासाठी कोणतीही दक्षिणा, उपहार, देणग्या, दाने, फी किंवा कोणत्याही प्रकारचा इतर आकार मागील किंवा त्यासाठी आग्रह धरील;

(क) अशा कोणत्याही व्यक्तीकडून, तिच्यासाठी किंवा तिच्या वतीने कोणताही धार्मिक विधी किंवा धार्मिक समारंभ पार पाडण्यासाठी कोणतीही गैरवाजवी दक्षिणा, उपहार, देणगी, दान, फी किंवा इतर आकार मागील किंवा त्यासाठी आग्रह धरील;

(ड) अशा कोणत्याही व्यक्तीने असा कोणताही गैरवाजवी आकार देण्यास किंवा देण्याचे मान्य करण्यास काकू केल्याबद्दल किंवा देण्याचे नाकारल्याबद्दल किंवा खंड (ब) खालील कोणतेही आकार किंवा यथास्थिति खंड (क) खालील कोणतेही गैरवाजवी आकार देण्यासाठी बळजबरी करण्याच्या उद्देशाने त्या व्यक्तीचा अपमान करील किंवा तिला त्रास देईल, शिवीगाळ करील, धक्काबुक्की करील किंवा जखमी करील;

त्याला दोषसिध्दीनंतर, सहा महिनेपर्यंतच्या कारावासाची शिक्षा किंवा पाचशे रुपयांपर्यंतच्या दंडाची शिक्षा होईल किंवा अशा दोन्ही शिक्षा होतील.

**स्पष्टीकरण.**——या कलमाच्या प्रयोजनासाठी "गैरवाजवी आकार मागणे" या संज्ञेमध्ये ज्या व्यक्तीने आपला उपहार दिला आहे किंवा उपहार देण्याचे योजिले आहे अशा कोणत्याही व्यक्तीने उपाध्यायांच्या किंवा पुजाऱ्यांच्या वेगवेगळ्या वर्गांना तितक्याच किमतीचा उपहार द्यावा यासाठी तिच्यामागे कटकट करणे, तशी मागणी करणे किंवा याचना करणे किंवा जिने कोणताही धार्मिक विधी किंवा समारंभ पार पाडला आहे अशा व्यक्तीशी आकार आधीच निश्चित न करता एकाच विधीच्या किंवा समारंभाच्या वेगवेगळ्या टप्प्यांसाठी एकाच किंवा वेगवेगळ्या किमतीचे उपहार स्वतंत्रपणे द्यावे म्हणून तिच्यामागे कटकट करणे, तशी मागणी करणे किंवा याचना करणे या गोष्टींचा समावेश होतो.

४. जो कोणी या अधिनियमाखालील कोणताही अपराध करण्यास अपप्रेरणा देईल त्याला दोषी ठरवण्यात आल्यानंतर, त्या अपराधासाठी तरतूद करण्यात आली असेल एवढी शिक्षा होईल. अपप्रेरकाला (अॅबेटर) शिक्षा.

१९७४ चा २. ५. फौजदारी प्रक्रिया संहिता, १९७३ यामध्ये काहीही अंतर्भूत असले तरी या अधिनियमाखालील प्रत्येक अपराध दखलपात्र असेल आणि असा प्रत्येक अपराध न्यायालयाच्या परवानगीने आपसात मिटवता येईल. अपराध दखलपात्र आणि आपसात मिटवण्याजोगा असणे.

अधिनियमाच्या योग्य अंमलबजावणीसाठी व्यक्तींची नियुक्ती करण्याचा किंवा त्यांना प्राधिकृत करण्याचा अधिकार.

६. (१) या अधिनियमाच्या योग्य अंमलबजावणीसाठी राज्य शासनाला किंवा जिल्हा दंडाधिकाऱ्याला वेळोवेळी, एका किंवा अधिक अधिकाऱ्यांची, वॉर्डनची आणि इतर व्यक्तींची नेमणूक करता येईल किंवा त्यांना प्राधिकृत करता येईल आणि त्या व्यक्तींना, त्याला योग्य वाटेल असे पदनाम आणि अशी कर्तव्ये देता येतील.

(२) अशा प्रकारे नियुक्त केलेल्या किंवा प्राधिकृत केलेल्या व्यक्ती, राज्य शासनाच्या आणि जिल्हा दंडाधिकाऱ्याच्या अधीक्षणास, निदेशनास आणि नियंत्रणास अधीन राहून, या अधिनियमाच्या कोणत्याही तरतुदीचे उल्लंघन होत नाही हे पाहाण्यासाठी, आणि असे उल्लंघन होऊ नये यासाठी योग्य ते उपाय योजण्यासाठी आणि योग्य बाबतीत, या अधिनियमाच्या कोणत्याही तरतुदींच्या उल्लंघनाबद्दल खटला दाखल करण्यासाठी व त्यावर देखरेख ठेवण्यासाठी पंढरपूरच्या कोणत्याही मंदिरात येणाऱ्या सर्व व्यक्तींवर आणि तेथे कोणतीही सेवा करणाऱ्या व्यक्तींवर सर्वसाधारण देखरेख ठेवतील.

(३) राज्य शासनाला, **शासकीय राजपत्रातील** अधिसूचनेद्वारे, या कलमान्वये नियुक्त केलेल्या किंवा प्राधिकृत केलेल्या व्यक्तींना या अधिनियमान्वये त्यांच्यावर लादलेली कर्तव्ये पार पाडणे त्यांना शक्य व्हावे म्हणून जे अधिकार प्रदान करणे त्याला (शासनाला) योग्य वाटेल असे अधिकार, कोणत्याही पोलीस अधिकाऱ्याच्या अधिकारांसह प्रदान करता येतील :

परंतु अधिपत्राशिवाय कोणत्याही व्यक्तीस अटक करण्याचा अधिकार, शासकीय सेवक नसणाऱ्या कोणत्याही व्यक्तीला प्रदान करण्यात येणार नाही.

अधिनियमान्वये नियुक्त केलेली किंवा प्राधिकृत केलेली व्यक्ती लोकसेवक असणे.

७. या अधिनियमान्वये नियुक्त केलेल्या किंवा प्राधिकृत केलेल्या सर्व व्यक्ती, भारतीय दंड संहितेच्या कलम २१ च्या अर्थानुसार लोकसेवक असल्याचे मानण्यात येईल. १८६० चा ४५.

सद्भावनेने केलेल्या कृतींचे संरक्षण.

८. राज्य शासनाने, जिल्हा दंडाधिकाऱ्याने किंवा या अधिनियमान्वये नियुक्त केलेल्या किंवा प्राधिकृत केलेल्या कोणत्याही व्यक्तीने या अधिनियमान्वये सद्भावनेने केलेल्या किंवा करण्याचा उद्देश असलेल्या कोणत्याही गोष्टीसाठी त्यांच्यापैकी कोणाही विरुद्ध कोणताही दावा, खटला किंवा इतर वैध कार्यवाही दाखल करण्यात येणार नाही.

अधिनियमाचा अधिभावी प्रभाव.

९. त्यावेळी अंमलात असणाऱ्या इतर कोणत्याही कायद्यामध्ये किंवा ज्या कोणत्याही कायद्याच्या आधारे अंमलात असलेल्या कोणत्याही रुढीमध्ये, परिपाठामध्ये किंवा लेखामध्ये किंवा कोणत्याही न्यायालयाच्या किंवा इतर प्राधिकरणाच्या कोणत्याही न्यायनिर्णयात, हुकूमनाम्यात किंवा आदेशात एतद्विरुद्ध काहीही अंतर्भूत असले तरी, या अधिनियमाच्या तरतुदी परिणामक्षम असतील.

(यथार्थ अनुवाद)

**य. शं. कानिटकर,**
भाषा संचालक व शासनाचे पदसिद्ध उप सचिव.
सामान्य प्रशासन विभाग.

शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई